तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांची कंपन्यांमध्ये निवड

कोल्हापूर, ता. १५: शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातर्फे विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांमध्ये निवड करण्यात आली. अधिविभाग संचालक प्रा. डॉ. जयदीप एस. बागी यांनी नियोजन केले.

इलेकट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशनमधून सहा, मेकॅनिकल इंजिनिअरिंगमधून पाच, कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजीमधून २२, फूड टेकनॉलॉजीतून चार, केमिकल इंजिनिअरिंगमधून पाच विद्यार्थ्यांची निवड केली.

टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसमध्ये केशव शिंदे, प्रसाद चौधरी, हर्षवर्धन पाटील, वृषाली सावंत, निखिल पत्रावळे, प्रेरणा राजपूत, अमोल देवकाते, वैभव पाटील, ललित ढाणे, ओंकार कोष्टी, ऋषिकेश नलवडे यांची तर इन्फोसिसमध्ये वेदांत दाविले, अंकिता श्रींगारे, ऐश्वर्या चव्हाण, सिध्दांत खर्डेकर, वेद इंगलेश्वर यांची निवड झाली. विप्रोमध्ये नीलेश हलगे यांची आयबीएममध्ये ऐश्वर्या चव्हाण, तर पर्सिस्टंट सिस्टम्ससाठी विश्वजित घाटगे, रिलायन्स जिओसाठी वैभव गुंजाटे, पेप्सिको इंडिया होल्डिंग्ससाठी सुरज मस्के, डीएलईसीटीए फूडसाठी अनिकत भोसले, केक फॅक्टरीसाठी शुभम हावळे, घोडावत फूड्स इंटरनॅशनलसाठी सदानंद जाधव, देवमेथ टेकनॉलॉजिसाठी सुरेश कुमार राय, सुचिता तोरानेवाले यांची निवड झाली. अटॉस सँटल कंपनीसाठी शंतनू बलसे, ए झेस्ट कंपनीसाठी अंगद चोपडे, वोलांटे कंपनीसाठी सौरभ घाटगे, हेक्सावेयर कंपनीत शिवम चंगोत्रा, शिल्पा बोंबले यांची निवड झाली. मंडी क्राफ्ट सोल्युशन्समध्ये अखिल सलगोत्रा, आकाश भोसले यांची तर मौरी टेक कंपनीसाठी श्रुती लटे, कल्याणी पवार, वेलोस टेक इन्साईट्ससाठी पोरस जाधव, राजवर्धन कुलकर्णी, शुभम कुलकर्णी, झेड एफ स्टेरिंग गियरसाठी संजय गावडे यांची निवड झाली.